# हमीपत्र

## प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आवास प्लस- 20

**नोंदणी क्र. -----------------------** **दिनांक :   /   /**

**प्रति,**

**मा. प्रशासक/ग्रामपंचायत अधिकारी,**

**ग्रामपंचायत कार्यालय, --------------------------- ता.   जि.   ,**

**विषय :- प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत आवास प्लस 20 सर्वेक्षणातील लाभार्थी म्हणून कायम स्वरुपी प्रतीक्षा यादी (Priority Wilting List - PWL) मध्ये माझे नाव कायम ठेवणे बाबत.**

**अर्जदार :-** ------------------------------------------------------------------------------------------------

**लाभार्थी आयडी:-** ------------------------------------------------------------------------------------------------

**महोदय,**

वरील विषयी मी खालील सही करणार हमीपत्र लिहुन देतो/देते की, मी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत आवास प्लस ….. सर्वेक्षणामध्ये मला घरकुल मंजुर होण्यासाठी लाभार्थी म्हणुन मी दिलेली माझी सर्व वैयक्तिक, कौटुंबिक, आर्थिक आणि मालमत्ते विषयीची माहिती पूर्णपणे खरी व सत्य आहे. मी व माझ्या कुटूंबाने प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) पात्रतेच्या व खालील सर्व अपात्रतेच्या निकषांची तपासणी केली असून माझे कुटूंब खालील कोणत्याही निकषात बसत नाही. म्हणूनच माझे कुटूंब सदरील घरकुल योजनेस पुर्णपणे पात्र आहे.

1. माझ्या किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावे आज रोजी महाराष्ट्रात / भारतात कुठेही **पक्के घर नाही.**
2. माझ्या किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावे **तीन / चारचाकी वाहने** (कार, ट्रैक्टर, हार्वेस्टर, ट्रक, इत्यादी) नाहीत.
3. माझ्या कुटूंबाकडे **रुपये 50,000/-** किंवा त्याहून अधिक मर्यादचे **क्रेडिट कार्ड नाही**.
4. माझ्या कुटूंबातील सदस्यांपैकी कोणीही **शासकीय/निमशासकीय सेवेत नाही.**
5. माझ्या कुटूंबातील सदस्यापैकी कोणतीही व्यक्ती **आयकर किंवा व्यवसाय कर** (Income Tax/Professional Tax) **भरत नाही.**
6. माझ्या कुटूंबाकडे **जिरायती जमीन 5 एकरपेक्षा जास्त** किंवा **सिंचित जमीन 2.5 एकरपेक्षा जास्त नाही.**
7. माझ्या **कुटूंबातील कोणत्याही सदस्याचे मासिक उत्पन्न रुपये 15000/- पेक्षा जास्त नाही.**
8. माझ्या किंवा माझ्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याच्या नावे **तीन / चारचाकी कृषी उपकरणे** (ट्रैक्टर, हार्वेस्टर, इत्यादी) नाहीत.
9. माझ्या कुटुंबातील सदस्याच्या नावावर **सरकारकडे नोंदणीकृत बिगर-शेती उद्योग किंवा व्यवसाय नाही.**
10. माझ्या किंवा **माझ्या कुटूंबातील कोणत्याही सदस्याच्या नावे यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतुन "घरकुलाचा लाभ" घेतलेला नाही.**

वरील सर्व निकष व मी दिलेली सर्व माहिती पूर्णपणे सत्य असून यात काहीही लपवून ठेवलेल नाही. भविष्यात कोणत्याही टप्यावर **सर्वेक्षणातील माहिती चुकीची, असत्य अथवा बनावट आढळल्यास माझे घरकुलाची मंजुरी त्वरीत रद्द करण्यात येइल.** याची मला पूर्ण जाणिव आहे. तसे आढळल्यास शासनाकडुन मला मिळालेली घरकुल अनुदानाची रक्कम मी व्याजासह परत करण्यास वाधिल राहीन आणि शासन **नियमानुसार होणाऱ्या कायदेशीर फौजदारी शिक्षेस मी स्वतः जबाबदार राहीन**. करीता मी हे हमीपत्र लिहुन देत आहे.

**सोबत : आवश्यक कागदपत्रे जोडली आहेत**

१) आधार कार्ड झेरॉक्स प्रत. २) राशन कार्ड झेरॉक्स प्रत. ३) बैंक पासबुक झेरॉक्स प्रत.

**साक्षीदारांची माहिती व स्वाक्षरी** **(लाभार्थीची सही/ अंगठा)**

**1) साक्षीदार नाव व सही :-** ------------------------------------------------ **लाभार्थ्याचे नाव :-** ---------------------------------------

**2) साक्षीदार नाव व सही :-** ------------------------------------------------ **मोबाइल क्र :-**---------------------------------------------

**www.ShelkeTech.com**